मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

दिनांक २१ डिसेंबर १९९३ रोजी झालेल्या १४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १४ वी बैठक मंगळवार दिनांक २१ डिसेंबर १९९३ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील सभागृहांत संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १] | डॉ. शंकर वा. मटकर | – | सभापती. |
| २] | श्री. हेमराज शहा | – | उपसभापती. |
| ३] | श्री. अशोक लाल | – | ~~सदस्य.~~ मुख्य अधिकारी |
| ४] | श्री. पोतदार | – | सदस्य. |
| | प्रमुख्य अभियंता, मुंबई म. न. पा. यांचे प्रतिनीधी | – | |
| ५] | श्री. व्ही. बी. वरसकर | – | सदस्य. |
| ६] | श्री. कमलाकर शर्मा | – | सदस्य. |
| ७] | श्री. शंकरराव पिटला | – | सदस्य. |
| ८] | श्री. फारुख मन्सूरी | – | सदस्य. |
| ९] | श्री. विवेक भर्तू | – | सदस्य. |
| १०] | श्री. आजम खान | – | सदस्य. |
| ११] | श्री. चेतन शहा | – | सदस्य. |
| १२] | श्री. श्रीकांत पाटील | – | सदस्य. |
| १३] | श्री. गजेंद्र लष्करी | – | सदस्य. |
| १४] | श्री. रॉकी कास्टो | – | सदस्य. |
| १५] | श्री. दवे सहाय्यक करनिर्धारक व संकलक. | – | निमंत्रित. |

मा. सभापती, डॉ. शंकर वा. मटकर यांचे अध्यक्षतेखाली सभेस प्रारंभ झाला. प्रारंभी मा. सभापती, उप सभापती, सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करण्यांत आले.

बाब क्रमांक:१४/१

विषय:- दिनांक ३०.११.९३ रोजी झालेल्या १३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांत स्थायी करणे.

दिनांक ३०.११.९३ रोजी झालेल्या १३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत पृष्ठ क्र.१ ते १२ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली. सर्वश्री हेमराज शहा व शंकरराव पिटला यांनी सूचना केली की, पुनर्विकास झालेल्या इमारतीमधील रिक्त गाळ्यांची यादी सादर करण्याचे ठरले होते. त्याचा उल्लेख पृष्ठ क्र.४ वर पहिल्या परिच्छेदांत करण्यांत यावा, ही सूचना मान्य करण्यांत आली. सविस्तर चर्चेअंती वरील सुधारणेसह दिनांक ३०.११.९३ रोजी झालेल्या १३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यांत आला.

पूर्तता
मुख्य
अधिक

बाब क्रमांक:१४/२

विषय:- अनुपालन अहवाल.

पूर्तता
उपमुख
अधिक
[सं.

उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी दु.व पु.मंडळास रु.१० कोटीचा निधी कर्ज म्हणून देण्याविषयी दिनांक २ डिसेंबर ९३ रोजी शासनास पाठविलेल्या पत्राची प्रत पृष्ठ क्र.१३ वर सादर केली आहे. त्यासंबंधी सविस्तर चर्चा करण्यांत आली. या पत्रातील माहितीनुसार मार्च-१९९३ पर्यंत दुरुस्ती उपकराची थकबाकी रु.५२.५६ कोटी एवढी आहे. मुंबई महानगरपालिकेचे प्रतिनीधी श्री.दवे यांनी माहिती दिली की वरील थकबाकीपैकी पुढील प्रकरणी म्हाडा व शासनाने निर्णय घेतल्यानंतर मुंबई महानगरपालिकेस थकबाकी वसुलीची कार्यवाही करतां येईल.

पूर्तता
उपमुख
अधिक
[पु.ग

[१] दुरुस्ती उपकरांतून सूट मिळण्याविषयी वादग्रस्त प्रकरणे.

[२] वाढीव दुरुस्तीच्या वसुलीच्या तारखेबद्दल वाद असलेली प्रकरणे, पुढील प्रकरणी वसुलीची कार्यवाही सुरु असून ३१ मार्च ९४ पर्यंत यापैकी मोठया रकमेची वसुली अपेक्षित आहे.

[३] पट्टीयोग्य मूल्याविषयी तक्रारी.

[४] महानगरपालिकेकडून वसुलीसाठी चालू असलेली प्रकरणे.

उर्वरित प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्यामुळे न्यायालयाच्या निर्णयानंतरच पुढील कार्यवाही करण्यांत येईल. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, मुख्य लेखाधिकारी यांनी अनु. [१] व [२] विषयीचा अहवाल मुख्य अधिकारी यांना सादर करावा. महापालिका अतिरिक्त आयुक्त श्रीमती सुधा भावे यांचेकडे संयुक्त बैठक आयोजित करुन उपकराची थकबाकी प्रभावीपणे करता यावी या विषयीची उपाययोजना निश्चित करावी असे ठरले. मुंबई महानगरपालिकेतर्फे करण्यांत आलेली थकबाकीची वसूली व शासनाकडे सुपूर्द केलेले अंशदान या विषयीचा अहवाल प्रत्येक बैठकीत सादर करण्याचे श्री. दवे यांनी मान्य केले. श्री. दवे यांनी सूचना केली की, जुनी इमारत रिकामी झाल्यानंतर तेथील रहिवाशांचे पत्ते घरमालकास कळविण्यास त्यांना भाडयाची व उपकराची वसूली करणे सुलभ होईल. ही सूचना मान्य करण्यांत आली.

पूर्तता मुख्य अधिकारी.

पूर्तता उपमुख्य अधिकारी [सं. शि.]

मंडळाच्या पुनर्रचित इमारतीमधील रिक्त गाळयांची माहिती पृष्ठ क्र. १७ ते ५१ वर सादर केली आहे. ही माहिती अपूर्ण आहे अशी तक्रार केली. सहमुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, न्यायालयीन स्थगनादेश असलेल्या गाळयांची माहिती या यादीत दिलेली नाही. सविस्तर चर्चेअंती मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अधिकारी [पु. गा.] यांना आदेश दिले की, सदस्यांच्या सूचनेनुसार पुनर्रचित इमारतीमधील रिक्त गाळयांचा परिपूर्ण अहवाल मुख्य अधिकारी यांच्या मान्यतेनंतर सदर अहवाल मंडळाच्या बैठकीत सादर करण्यांत येईल.

पूर्तता उपमुख्य अधिकारी [पु. गा.]

मा. श्री. हेमराज शहा व अन्य सदस्यांनी निदर्शनास आणून दिले की, पुनर्बांधणी योजना कार्यान्वित होऊ शकणार नाही अशा उपकरपात्र इमारती व त्यांतील रहिवाशांची बृहतसूची सादर करण्याचे मागील बैठकीत मान्य झाले होते. परंतु माहिती प्राप्त झालेली नाही. सहमुख्य अधिकारी यांनी सांगितले की, विधानसभेच्या अधिवेशनाच्या कामामुळे तसेच अनधिकृत गाळेधारकांना नियमित करण्याच्या कामास विशेष प्राधान्य दिले असल्यामुळे या विषयीचा सविस्तर अहवाल तयार होऊ शकला नाही. लवकरच सदर अहवाल सादर करण्यांत येईल. मुख्य अधिकारी यांनी सूचना दिली की आतापर्यंत प्रसिध्दी झालेल्या बृहतसूचीच्या सर्व याधा बैठकीत सादर करण्यांत याव्यात.

मा. श्री. हेमराज शहा व अन्य सदस्यांनी निदर्शनास आणून दिले की, मंडळाने आतापर्यंत घेतलेल्या निर्णयाच्या संदर्भात कोणती कार्यवाही

केली याची सभासदनांना माहिती नाही. सहमुख्य अधिकारी यांनी या संदर्भात मान्य केले की, मंडळाच्या बैठकीतील निर्णयांच्या कार्यवाहीच्या संदर्भात कर्मचारी नियुक्त करुन आढावा घेण्यांत येईल व त्याचा अहवाल बैठकीत सादर करण्यांत येईल.

पूर्तता
सहमुख्य अधिकारी.
सचिव.

इमारत क्र. ६२ खत्तरगल्ली या इमारतीच्या दुरुस्तीच्या संदर्भात अनुपालन अहवाल पृष्ठ क्र. ५१-अ वर सादर केलेला आहे. श्री. शंकरराव पिटला यांनी सांगितले की, अनधिकृत बांधकामाविषयी पहाणी करण्याची आवश्यकता आहे. सविस्तर चर्चेअंती श्री. शंकरराव पिटला यांनी इमारतीची संयुक्त पहाणी करुन पुढील कार्यवाही करावी असे ठरले.

पूर्तता
उपमुख्य अभियंता
[दक्षिण]

भूकर पहाणी क्र. ७२८ गिरगांव विभाग, इमारत क्र. १२२ आदेशिर दादी स्ट्रीट येथील "अशोक निवास" या मालमत्तेच्या पुनर्विकासासंबंधीचा अनुपालन अहवाल पृष्ठ क्र. ५३ व ५५ सादर केला आहे. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. सदस्यांनी सूचना केली की म्हाडा अधिनियम ८८ [३] [अ] अन्वये प्रदान केलेले प्रमाणपत्र रद्द न करतां मालमत्तेच्या पुनर्विकास करतां येईल काय याविषयी विधी सल्लागार/प्रा. यांचा अहवाल प्राप्त करावा अशी सूचना श्री. चेतन शहा यांनी केली. या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की म्हाडा अधिनियमांतील तरतूदीनुसार इमारतीच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेपेक्षां अधिक होत असेल तर ती इमारत दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादे पलिकडे आहे असे घोषित करावे लागते. जर भाडेकरु किंवा घरमालकांनी दुरुस्तीचा अतिरिक्त खर्च करुन इमारत दुरुस्तीची तयारी दर्शविल्यास ८८ [३] अ अन्वये दिलेले प्रमाणपत्र रद्द करण्याची कोणतीही आवश्यकता नाही व या संदर्भात विधी सल्लागार/प्राधिकरण यांचा अहवाल मागविण्याचा प्रश्न उद्भवत नाही. श्री. चेतन शहा व अन्य सदस्यांनी सूचना केली या प्रकरणाच्या संदर्भात सदस्यांना कायदेशीर तरतूदी तपासून पहाण्याची आवश्यकता असल्यामुळे सदर प्रस्ताव आजच्या बैठकीत चर्चेस घेऊ नये. सविस्तर चर्चेअंती ही सूचना बहुमताने मंजूर झाली.

पूर्तता
निवासी
कार्यकारी
अभियंता

बाब क्रमांक:- १४/३/१
+++++++++++++++++

विषय:- काळेवाडी भट चाळ, गं. द. आंबेकर मार्ग परळ, या पुनर्रचित इमारतीस नांव देण्याचा प्रस्ताव.

वरीलप्रमाणे प्रस्ताव पृष्ठ क्र. ६३ वर सादर केला आहे. सविस्तर चर्चेअंती या इमारतीस "खापरीदेव सदन" हे नांव देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यांत आला.

ठराव क्रमांक :१४/९८

काळेवाडी भट चाळ, गं. द. आंबेकर मार्ग, परळ येथील पुनर्रचित इमारतीस "खापरीदेव सदन" हे नांव देण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यांत आला.

बाब क्रमांक:१४/३/२

विषय:- ३४ रेशम भुवन ३०-अ पांडुरंग निवास ६९-७१ अब्दुल लतीफ चाळ, ७३. ७५ गमतकुमारी चाळ, ३२ सालपाची चाळ परळ या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मंजुरी मिळण्याविषयी.

या विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. ६५ वर सादर केली आहे. उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांना या प्रस्तावाची सविस्तर माहिती दिली. वरीलप्रमाणे ५ जुन्या इमारतींच्या जागी मंडळातर्फे संयुक्त पुनर्बांधणी योजना मार्च ९० मध्ये कार्यान्वित करण्यांत आली. न्यायालयीन स्थगनादेशामुळे ७३-७५ गमतकुमारी चाळ ही इमारत पाडणे शक्य न झाल्यामुळे ही इमारत सोडून अन्य जमिनीवर योजनेचे काम सुरू करण्यांत आले व १०. ९. ९२ रोजी या भागावरील पुनर्बांधणीचे काम पूर्ण झाले व त्याचा प्रत्यक्ष खर्च रु. ८७. ४७ लक्ष एवढा झालेला आहे. या योजनेच्या ठेकेदारास मार्च १९९३ मध्ये करारमुक्त करण्यांत आले. त्यानंतर जुलै ९३ मध्ये दाव्याचा निकाल लागून गमतकुमारी चाळ ही जुनी इमारत पाडण्यांत आली व या भागावरील पुनर्बांधणी योजनेच्या उर्वरीत कामास आता सुरुवात करावयाची आहे. या कामाचा अपेक्षित खर्च रु. ४८. ३५ लक्ष असून एकूण रु. १, ३५, ८३, ३५५ एवढया खर्चास पुन्हा सुधारीत मंजुरी द्यावी, अशी विनंती करण्यांत आली. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. मा. श्री. हेमराज शहा, शकरराव पिटला, चेतन शहा कमलाकर शर्मा व अन्य सदस्यांनी सूचना केली की झालेल्या कामाच्या खर्चासाठी प्रशासकीय मंजुरी मागण्याच्या ऐवजी योजनेच्या उर्वरीत भागाच्या पुनर्बांधणीच्या कामासाठी अपेक्षित असलेल्या रु. ४८, ३५, ८४०/- एवढया खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्यांत यावी. सविस्तर चर्चेअंती ही सूचना मान्य करण्यांत आली.

ठराव क्रमांक:१४/९९

३४ रेशम भुवन, ३०-अ, पांडुरंग निवास ६९.७१ अब्दुल लतीफ चाळ, ७३-७५ गमतकुमारी चाळ, ३२ सालपाची चाळ या इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणीच्या रु.८७.२२ लक्ष एवढ्या खर्चास दि. २१.१२.८९ रोजीच्या बैठकीत सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली होती. या व्यतिरिक्त ७३-७५ गमतकुमारी चाळ या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या रु.४८,३५,८४०/- एवढ्या अंदाजित खर्चास पुन्हा सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्रमांक:१४/४/१

विषय:- उत्तर परिमंडळातील जुन्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याविषयी.

या विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्र. ६९ वर सादर केली आहे उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी या विषयाची सविस्तर माहिती दिली. त्यांनी खुलासा केला की, सादर केलेली अंदाजपत्रके इमारतींना टेकू लावणे या कामासाठी असून त्यांत धोकादायक भाग तोडण्याच्या खर्चाचा समावेश या विषयावर चर्चा झाली. मा.श्री. हेमराज शहा, श्रीकांत पाटील शंकरराव पिटला, फारुख मन्सूरी, रॉकी क्रॉस्टो व अन्य सदस्यांनी विचारणा केली की, आर्थिक वर्ष ३१ मार्च ९४ पर्यंत असताना ३१ ऑक्टो९४ पर्यंतच्या खर्चाला प्रशासकीय मंजूरी कशी काय प्रस्तावित केली आहे. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, पावसाळ्याच्या कालावधीत धोकादायक भागास टेकू लावण्याची कामे मोठ्या प्रमाणांत हाती घेण्यांत येतात. त्यामुळे साधारणपणे पावसाळा संपल्यानंतर म्हणजेच १ नोव्हेंबर ते ३१ ऑक्टोबर या एक वर्षाच्या कालावधीसाठी वार्षिक निविदा मागविण्याची प्रथा आहे.

मुख्य अधिकारी यांनी माननीय सदस्यांना समजावून सांगितले की, कोणत्याही कामाचा कालावधी काय असावा हे तांत्रिक मुद्यांवर अवलंबून असते. उदाहरणार्थ टेकू लावण्याच्या कामाकरिता निविदा १ नोव्हेंबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीसाठी मागविणे इष्ट ठरेल. तसेच गृहबांधणीचा मोठा प्रकल्प असेल तर कदाचित कामाचा कालावधी हा ३ ते ४ वर्षापर्यंतचा असू शकतो. आपले वित्तीय वर्ष जरी १ एप्रिल ते ३१ मार्च असे आहे तरी अशा प्रकारच्या कामाची २ किंवा ४ भागांमध्ये

विभागणी करता येत नाही. परंतु जोपर्यंत अंदाजपत्रकाचा प्रश्न आहे, मंडळाची प्रशासकीय मंजुरी प्रत्येक वित्तीय वर्षाकरिता घेतली जात आहे. याच टेकू लावण्याच्या प्रकरणामध्ये प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये दोन वेगवेगळ्या कॉन्ट्रॅक्ट पिरियडचा समावेश होईल. म्हणजे वित्तीय वर्ष १९९३-९४ यामध्ये उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी १.११.९२ ते ३१.१०.९३ पर्यंत मान्य केलेल्या टेंडरचा काही कालावधी राहिल. तसेच त्यांनी १.११.९३ ते ३१.१०.९४ या कालावधीसाठी मान्य केलेल्या टेंडरचासुध्दा काही भाग राहिल. याच स्पष्टीकरणाचा विचार करुन मंडळाने १.११.९३ ते ३१.३.९४ हया कालावधीसाठी रु.२०.१९ लक्ष एवढया खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याचा निर्णय एकमताने घेतला.

ठराव क्रमांक:१४/१००

उत्तर परिमंडळातील इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामासाठी १.११.९३ ते ३१.३.९४ या कालावधीच्या रु.२०.१९ लक्ष एवढया अपेक्षित खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्रमांक:१४/४/२

विषय:- म्हाडा अधिनियम ८८ [३] [अ] अन्वये प्रदान करावयाचे प्रस्ताव.

म्हाडा अधिनियम ८८ [३] [अ] अन्वये इमारत दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेपलिकडे आहे असे घोषित करण्याविषयीचे प्रस्ताव पृष्ठ क्र.७१ ते ७७ वर सादर केले आहेत. सविस्तर चर्चेअंती या प्रस्तावांना एकमताने मंजुरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक:१४/१०१

म्हाडा अधिनियम ८८ [३] [अ] अन्वये पुढील इमारती दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेच्या पलिकडे आहेत असे घोषित करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

[१] १०२-१०४, अंधार चाळ, म्हातारपाखाडी रोड, माझगांव, ई-विभाग
[२] ५७ मुन्ना दर्गाचाळ, केशवराव खाडे मार्ग, ई-विभाग.
[३] रेवाबाई गुजराथी चाळ, ७२ परेल व्हिलेज रोड, एफ [दक्षिण] विभाग.
[४] कमलाबाई चाळ, ७० परेल व्हिलेज रोड, एफ[दक्षिण] विभाग.

बाब क्रमांक :१४/४/२

विषय:- उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती प्रस्ताव.

उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याचे प्रस्ताव पृष्ठ क्र. ७७ ते ७७-ब वर सादर केले आहे. मा. श्री. हेमराज शहा, शंकरराव पिटला, श्रीकांतपाटील, गजेंद्र लष्करी, फारुख मन्सूरी व अन्य सदस्यांनी आक्षेप घेतला की, पूर्वी झालेल्या दुरुस्ती कामांची बिले थकित असताना नवीन कामांना प्रशासकीय मंजूरी देऊ नये असा निर्णय झाला असताना या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देणे अयोग्य ठरेल. या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, पुनर्रचित इमारतीमधील अनधिकृत रहिवाशांच्या नियमित करण्याच्या योजनेस मोठा प्रतिसादर मिळत असून, त्याद्वारे सुमारे ३ कोटीचा निधी उपलब्ध झालेला आहे व दिनांक ३१.१२.१९९३ पर्यंत असून २.५० लक्ष वसूल होतील, अशी अपेक्षा आहे. त्या शिवाय दंगल व बॉम्बस्फोटात हानी पोहोचलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी करण्यांत आलेल्या खर्चाच्या प्रतीपूर्तीसाठी शासनाकडून अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळे थकित बिलांची रक्कम क्रमवार देणे शक्य होईल. त्याचप्रमाणे दुरुस्ती प्राधान्याने करण्याची आवश्यकता असलेल्या इमारतींची दुरुस्तीची कामे हाती घेणे शक्य होईल. सविस्तर चर्चेअंती थकीत बिलांची रक्कम पुढीलप्रमाणे अदा करावी असे ठरले.

[१] आमदार निधीमार्फत झालेल्या कामाच्या खर्चाची पूर्णपणे पूर्तता करणे.

[२] टेकू लावण्याच्या कामासाठी झालेल्या खर्चाची पूर्णपणे पूर्तता करणे.

[३] अन्य थकीत बिले क्रमवारीने अदा करणे.

तांतडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता असलेल्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी १४ वी जोड बैठक मंगळवार दिनांक २८.१२.९३ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करावी असे एकमताने ठरले. अशीही चर्चा झाली की मंडळाची सध्याची आर्थिक स्थिती लक्षांत घेता दिनांक ३१.१२.९४ पर्यंत मंडळास सुमारे २.५० कोटी अंदाजपत्रकीय खर्चाच्या रक्कमेऐवढी अतिरिक्त दुरुस्तीची कामे मंडळास

हाती घेणे शक्य होईल. ही कामे यापूर्वी मंजूर केलेल्या कार्यक्रमाव्यतिरिक्त असतील. उपमुख्य अभियंता [उत्तर] व [दक्षिण] यांनी अनुक्रमे रु. ३० लक्ष व ७०.०० लक्ष एवढया अंदाजित खर्चाचे दुरुस्तीचे प्रस्ताव दि. २८.१२.९३ रोजी होणाऱ्या बैठकीत सादर करावेत तसेच अनुक्रमे ४० लक्ष व ११० लक्ष एवढया अंदाजित खर्चाचे प्रस्ताव जानेवारी १९९४ मध्ये होणाऱ्या बैठकीत सादर करावेत.

इमारत क्र. १३२-१३४, शायदा मार्ग "ब" विभाग या इमारतीस झालेल्या अपघाताच्या भागाची तातडीने दुरुस्ती करण्याविषयीचा प्रस्ताव पृष्ठ क्र. ७९ वर सादर केला आहे. या विषयी सविस्तर चर्चेअंती दुरुस्ती कामाची तातडी लक्षांत घेता सदर खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यांत आला.

ठराव क्रमांक:१४/१०२

१३२-१३४, करीम मॅन्शन, शायदा मार्ग या इमारतीच्या चौथ्या टप्प्याच्या रु. १,२६,३४६/- एवढया दुरुस्ती खर्चास तातडीची बाब म्हणून प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्रमांक:१४/५

विषय:- उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करणे.

उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे ७ प्रस्ताव पृष्ठ क्र. ८१ ते १५३ वर सादर केले आहेत. सविस्तर चर्चेअंती पुनर्विकासाच्या सर्व ७ प्रस्तावांना ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव क्रमांक:१४/१०३

पुढीलप्रमाणे उपकरपात्र मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

[१] भूकर पहाणी क्र. १/३००, माझगांव विभाग इमारत क्र. २२ गनपावडर रोड "पारशी विडो चाळ" या मालमत्तेचा पुनर्विकास करणे.

[२] भूकर पहाणी क्र. २८६, गिरगांव विभाग इमारत क्र. ८७ तात्या घारपुरे पथ, गिरगांव डी"विभाग या मालमत्तेचा पुनर्विकास.

[३] अंतिम भूखंड क्र. ६७७, नगररचना योजना क्र. ४ माहिम विभाग, ११-अ, भंडारवाडा रोड, दादर [पश्चिम] येथील मालमत्तेचा पुनर्विकास.

[४] भूकर पहाणी क्र. ६१८, माझगांव विभ... त क्र. ३३-३१-ए, नारळवाडी डॉ. मस्कारेन्हास रोड, माझगांव या मालमत्तेचा पुनर्विकास.

[५] भूकर पहाणी क्र. ४२८, मांडवी विभाग, इमारत क्र. १३-१७ कुंभारवाडा, १ ली क्रॉस गल्ली "ब" विभाग या मालमत्तेचा पुनर्विकास.

[६] अंतिम भूखंड क्र. ५५१ बी नगररचना योजना क्र. ४ माहिम विभाग इमारत क्र. १८३, १८३-अ, १८३ सी-बी, भवानी शंकर मार्ग, दादर [पश्चिम] या मालमत्तेचा शासनाचे पत्र क्र. अेआरएस-११८९/सीआर १६८९/डी-२ दिनांक १०.१२.९३ अन्वये दिलेल्या अटी व शर्तीच्या आधीन राहून पुनर्विकास करणे.

[७] अंतिम भूखंड क्र. ८७२ नगररचना योजना क्र. ४ माहीम विभाग इमारत क्र. २०-अ, २०-ब रावबहादूर एस्. के. बोले मार्ग या मालमत्तेचा पुनर्विकास.

बाब क्रमांक: १४/६

विषय:- अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय.

पुनर्रचित इमारतीमधील अनधिकृत रहिवाशांना नियमित करण्याच्या योजनेच्या प्रगतीविषयी पुढीलप्रमाणे माहिती सहमुख्य अधिकारी यांनी सभागृहात सादर केली.

| दंडाची रक्कम. | आलेले अर्ज. | एकूण रक्कम. |
|---|---|---|
| रु. १५,०००/- | १४६७ | २,२०,०५,०००/- |
| रु. २०,०००/- | ३४१ | ६८,२०,०००/- |
| रु. २५,०००/- | ८० | २०,००,०००/- |
| | | ३,०८,२५,०००/- |

यः व्यतिरिक्त अर्जाच्या विक्रीद्वारे रु. १,००,७२५/- एवढी रक्कम उपलब्ध झालेली आहे. ... विषयावर चर्चा झाली. श्री. श्रीकांत पाटील यांनी सूचना केली की या योजनेस मिळालेला प्रतिसाद लक्षांत घेता या योजनेत सहभागी होण्यासाठी दिलेली ३१ डिसेंबर ९३ या अंतिम तारखेत वाढ करण्यांत यावी. मा. सभापतींनी सूचना केली की, अधिकाधिक रहिवाशांनी या योजनेत सहभागी होऊन मंडळाचा निधी वाढावा या दृष्टीने या योजनेत सहभागी होण्यासाठी अंतिम तारीख ३१ जानेवारी ९४ ठेवावी असा प्रस्ताव प्राधिकरणास सादर करावा. यावर सदस्यांनी सूचना केली की, बहुतेक रहिवाशी कामगार व मध्यम वर्गातील आहेत. दंडाची रक्कम उभी करण्याच्या दृष्टीने मुदतीत किमान २ महिन्याची वाढ होणे आवश्यक आहे. सविस्तर चर्चेअंती या योजनेत सहभागी होण्यासाठी अंतिम तारीख २८ फेब्रुवारी १९९४ ठेवण्यांत यावी, असा प्रस्ताव प्राधिकरणास सादर करावा, असे ठरले.

ठराव क्रमांक:१४/१०४

पुनर्रचित इमारतींमधील अनधिकृत रहिवाशांना दंडात्मक रक्कम आकारुन नियमित करण्याच्या योजनेस मिळत असलेला मोठा प्रतिसाद लक्षांत घेऊन मंडळाच्या निधीत वाढ व्हावी या उद्देशाने या योजनेत सहभागी होण्यासाठी अंतिम तारीख २/ फेब्रु. ९४ निश्चित करावी अशी विनंती करणारा प्रस्ताव प्राधिकरणास ... करावा असा ठराव एकमताने मंजूर करण्यांत आला.

श्री. गजेंद्र लष्करी यांनी सूचना केली की, प्रतिक्षानगर, सायन या संक्रमण शिबीरांत शाळेची नितांत आवश्यकता असल्यामुळे मागील बैठकीत सादर केलेला कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयासंबंधीच्या प्रस्तावास मंजूरी द्यावी. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, मागील बैठकीत ठरविण्यांत आलेल्या निकषांच्या आधारे सुधारित प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा.

मा. सभापती, उपसभापती, सदस्य व उपस्थित अधिकारी व निमंत्रित यांचे आभार मानल्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे जाहीर करण्यांत आले.

सही/-
सचिव.

सही/-
मुख्य अधिकारी.

सही/-
सभापती.

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

### गुरुवार, दिनांक ३०.१.१९९३ रोजी झालेल्या १४ व्या जोड बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १४ व्या बैठकीची जोड बैठक गुरुवार, दिनांक ३०.१२.९३ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात संपन्न झाली. ह्या बैठकीस पुढीलप्रमाणे मान्यवर उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १] | डॉ. शंकर वामन मटकर | – | सभापती. |
| २] | श्री. हेमराज शहा | – | उपसभापती. |
| ३] | श्री. अशोक लाल | – | मुख्य अधिकारी. |
| ४] | श्री. यादवराव कांबळे | – | उपसचिव<br>महाराष्ट्र शासन<br>गृ. नि. व वि. स. विभाग. |
| ५] | श्री. रॉकी क्रास्टो | – | सदस्य. |
| ६] | श्री. कमलाकर शर्मा | – | सदस्य. |
| ७] | श्री. विवेक भर्तू | – | सदस्य. |
| ८] | श्री. मोहमंद फारुख मन्सूरी | – | सदस्य. |
| ९] | श्री. व्ही. पी. वरसकर | – | सदस्य. |
| १०] | श्री. शंकरराव पिटला | – | सदस्य. |
| ११] | श्री. मोहम्मद आझमखान | – | सदस्य. |
| १२] | श्री. गजेंद्र लष्करी | – | सदस्य. |
| १३] | श्री. श्रीकांत पाटील | – | सदस्य. |
| १४] | श्री. चेतन शहा | – | सदस्य. |

मा. सभापती डॉ. शंकर वामन मटकर यांनी उपस्थित उपसभापती, सदस्य व अधिकारी ह्यांचे स्वागत केले व तदनंतर मा. सभापती ह्यांच्या अध्यक्षतेखाली नियमित कामकाजास सुरुवात झाली.

### बाब क्रमांक:१४/७

विषय:- भूकर पाहरणी क्र. २४१–२४२, ताडदेव विभाग इ.क्र. २२–२६, शुक्लाजी स्ट्रीट इ.क्र. २६३–७३ बेलासिस रोड, भायखळा, मुंबई येथील बलवाल इस्टेट सहकारी संस्था [नियोजित] च्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. [फाईल क्र. ६१८]

पृष्ठ क्र. १ ते ७ वर उपरोक्त विषयावर दिलेल्या माहिती बाबत चर्चा झाली.

२००

मा. सदस्य श्री. विवेक भर्तू हयांनी अशी सूचना केली की, भाडेकरुंची यादी अनुपालन अहवालात सादर करावी.

पुनर्रचित होणा-या इमारतीत वापरण्यात येणारे क्षेत्रफळ, एकूण उपलब्ध होणारे क्षेत्रफळ, मंडळास मिळणारे क्षेत्रफळ इ. बाबतचा तपशिल मुंबई महानगरपालिकेने सुधारित बांधकाम प्रस्ताव मंजूर केल्यानंतर उपलब्ध होईल व ती माहिती नंतर मंडळास सादर करण्यात येईल, या अटीवर विषयांकित मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्यास मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक:१४
:::::::::::::

भाडेकरुंच्या यादी बद्दलची माहिती अनुपालन अहवालात सादर करण्याच्या अटीवर, तसेच पुनर्रचित होणा-या इमारतीत वापरण्यात येणारे क्षेत्रफळ एकूण उपलब्ध होणारे क्षेत्रफळ, मंडळास मिळणारे क्षेत्रफळ इ. बाबतचा तपशिल मुंबई महानगरपालिकेने सुधारित बांधकाम प्रस्तावाचे नकाशे मंजूर केल्यानंतर उपलब्ध होईल व ती माहिती नंतर मंडळास सादर करण्यात येईल या अटीवर "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्यात यावे असा ठराव एकमताने मंजूर करण्यांत आला.

बाब क्रमांक:१४/८
‡‡‡‡‡‡‡‡‡‡‡‡‡

विषय:- ना हरकत प्रमाणपत्राद्वारे होणा-या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत.

पृष्ठ क्र. ९ ते १५ वर उपरोक्त विषयाबाबत दिलेल्या तपशिलाच्या अनुषंगाने बैठकीत चर्चा झाली.

मा. सदस्य श्री. हेमराज शहा तसेच मा. सभापती डॉ. शं. वा. मटकर हयांनी असे प्रतिपादन केले की, इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांनी परताव्याची रक्कम मंडळाकडे उपलब्ध असलेल्या निधीनुसार घेण्यास तयार आहेत, अशाप्रकारचे हमीपत्र मंडळाकडे सादर करण्याच्या अटीवर सदर प्रस्तावासोबत जोडलेल्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्यात यावी. हयाबाबत मा. सदस्य श्री. चेतन शहा हयांनी, अशी शंका उपस्थित केली की, जर ना हरकत प्रमाणपत्र धारक परताव्याच्या रक्कमेपोटी न्यायालयात गेल्यास आपणांस काय करावे लागेल ? हयावर प्रदिर्घ

चर्चेनंतर असे ठरले की, भाडेकरू/रहिवाशांनी वर नमूद केल्याप्रमाणे मंडळाकडे सादर करावयाच्या हमीपत्रामध्ये ना हरकत प्रमाणपत्र धारक परताव्याच्या रक्कमेबाबत आग्रह धरणार नाही व मंडळाकडे निधी उपलब्ध झाल्यानंतरच प्रतिपूर्तीची मागणी करतील अशी अट घालण्यात यावी.

तद्नंतर मा. मुख्य अधिकारी ह्यांनी असे सुचविले की, ना हरकत प्रमाणपत्रांतर्गत होणा-या दुरूस्ती कामांमध्ये फक्त संरचनात्मक दुरूस्तीचेच काम करण्यात यावे व वर नमुद केल्याप्रमाणे हमीपत्र घेऊन मंजूरी देण्यात यावी. तसेच असाही निर्णय घेण्यात आला की, ३१.३.९४ पर्यंत परताव्याची रक्कम अदा करण्यासाठी सन १९९४-९५ च्या अंदाजपत्रकात आवश्यक तरतूद करण्यात येईल.

ह्या विषयाच्या चर्चेच्या ओघाओघाने मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला यांनी अशी विचारणा केली की, दुरूस्ती खर्चाची प्रमाणित विहीत मर्यादा रु. ५००/- प्रति. चौ. मी. वरुन रु. ७५०/- प्रति. चौ. मी. पर्यंत वाढविल्याचे आदेश मंडळास प्राप्त झाले आहेत किंवा कसे ? ह्यावर उपसचिव, महाराष्ट्र शासन श्री. यादवराव कांबळे ह्यांनी असा खुलासा केला की, दुरूस्तीची प्रमाणित मर्यादा रु. ५००/- प्रति चौ. मी. पर्यंत वाढविल्याची तरतूद प्राधिकरण अधिनियम-१९७६ मध्ये सुधारित करण्यांत आली आहे व ह्याबाबतचा वटहुकूम विधीमंडळाच्या अधिवेशनात मंजूर झालेला आहे त्यामुळे स्वतंत्र आदेशांची गरज नाही.

ठराव क्रमांक:१४

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेल्या १८ इमारतींच्या ना हरकत प्रमाणपत्रांतील दुरूस्तीच्या अंदाजपत्रकांना, ना हरकत प्रमाणपत्र धारकांकडून खालीलप्रमाणे हमीपत्र लिहून खालील प्रमाणे हमीपत्र लिहून घेण्याच्या अटीवर प्रशासकिय मंजूरी देण्यात आली.

"दुरूस्तीच्या परताव्याची रक्कम मंडळाकडे उपलब्ध असलेल्या निधीनुसार स्विकारली जाईल"

बाब क्रमांक:१४/९ व १४/१०

विषय:- मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळास प्राप्त होणा-या अपेक्षित रु. १ कोटी निधीच्या खर्चाचे नियोजन
[ ]

पृष्ठ क्र. १७ ते १९ वर सादर केलेल्या उपरोक्त विषयाच्या माहितीबाबत सविस्तर चर्चा झाली.

मंडळाकडे
रताव्याच्या
ल्यानंतरच

ना,
त्मक
रुन

५ च्या

ची

ांवा
ती

मा. उपसभापती, श्री. हेमराज शहा यांनी या विषयाच्या संदर्भात अशी शंका उपस्थित केली की, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे ज्या कामांची प्रगती ५०% च्या आसपास आहे अशा कामांना प्राधान्य दिले आहे म्हणजे ज्या कामांची प्रगती १०% आहे अशाही कामांना प्राधान्य देण्यात आले आहे का ? ह्याबाबत उपमुख्य अभियंता [दक्षिण] ह्यांनी असा खुलासा केला की यामध्ये अत्यंत आवश्यक असाच दुरुस्ती कामांचा समावेश आहे. ह्याबाबत मा. सभापती, श्री. हेमराज शहा ह्यांनी अशी विचारणा केली की, उपलब्ध निधीत चालू असलेल्या दुरुस्ती कामांबरोबर नविन दुरुस्ती कामांचा समावेश का केला नाही. त्याबाबत मुख्य अधिकारी ह्यांनी असा खुलासा केला की, मंडळाच्या पुढील बैठकीत दक्षिण परिमंडळासाठी रु. ११५.०० लक्ष व उत्तर परिमंडळासाठी रु. ३५.०० लक्ष निधीचा कार्यक्रम ठेवावा व ह्या कार्यक्रमामध्ये नविन अत्यावश्यक दुरुस्ती कामांचाही समावेश करण्यात येईल.

मा.
मुख्य अभियंता
[उत्तर/दक्षिण]

ह्याबाबत मा. सभापती श्री. शं. वा. सटकर यांनी असे सुचविले की, सध्या जी दुरुस्तीची कामे चालू आहेत अशा दुरुस्ती कामांची पाहणी त्या त्या विभागातील मा. सदस्यांनी संबंधित उपमुख्य अभियंता ह्यांचेशी संपर्क साधून करावी व अशा इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांच्या अडचणी/मागण्यांबाबतची माहिती पुढील बैठकीत सादर करावी.

चर्चेच्या ओघाओघाने मा. सदस्य श्री. वेरसकर ह्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, इमारत दुरुस्तीच्या कामात दुरुस्तीचे काम १०% पेक्षा अधिक का वाटते. ह्याबाबत उपमुख्य अभियंता [दक्षिण] ह्यांनी असा खुलासा केला की, सर्वच दुरुस्ती कामात दुरुस्तीचे काम १०% पेक्षा अधिक वाटत नाही. परंतु ज्यावेळी अंदाजपत्रके तयार केली जातात त्यावेळी इमारतीमधील बरेचसे गाळे बंद आढळतात ज्यामुळे अशा गाळ्यांची दुरुस्ती अंदाजपत्रकात अंतर्भूत केलेली नसते. परंतु प्रत्यक्ष दुरुस्ती काम सुरु झाल्यानंतर आवश्यकतेनुसार अशा बंद गाळ्यांची दुरुस्तीही विचारात घ्यावी लागते. ह्याबाबत मुख्य अधिकारी ह्यांनी अशा सूचना दिल्या की, मागील दोन वर्षात जी दुरुस्तीची कामे पूर्ण झाली आहेत त्यापैकी किती इमारतींच्या दुरुस्तीची अंदाजपत्रके सुधारित करावी लागली. ह्या बाबतची तपशिलवार माहिती [illegible] देण्यात यावी.

पूर्तता
उपमुख्य अभियंता
[द/उत्तर]

चर्चेच्या ओघात मा सदस्य श्री. शंकरराव पिटला ह्यांनी असे प्रतिपादन केले की, ज्या इमारतींमध्ये लादी/कोबा/लादी छताच्या दुरुस्तीची कामे होतात अशा दुरुस्ती कामांमध्ये/ठेकेदार व भाडेकरु ह्यांच्यामध्ये ह्या कामाचा ठेकेदाराला देण्याच्या दरावरुन वाद निर्माण होतो व त्यामुळे दुरुस्ती कामांना विलंब होतो तसेच संबंधित ठेकेदार त्याला हवा असलेला दर भाडेकरु/रहिवाशांनी द्यावा म्हणून त्यांच्यावर दबाव आणतो. ह्या गोष्टीला पायबंद घालण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आणाले. ह्याबाबत मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अभियंता [दक्षिण व उत्तर] ह्यांना सुचविले की, अशा दुरुस्ती कामांवर संबंधित उप अभियंता ह्यांना प्रत्यक्ष जागेवर पाठवून ठेकेदार व भाडेकरु ह्यांच्यात समन्वय साधून असे प्रकार न घडण्याची काळजी घ्यावी.

ठराव क्रमांक : १४
:::::::::::::::

सविस्तर चर्चेअंती बाब क्र. १४/९ व १४/१० अन्वये सादर करण्यात आलेल्या रु. १.०० कोटी निधीच्या खर्चाच्या नियोजनास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

बाब क्र. १४/१० मध्ये पृष्ठ क्र. ३७ वर सादर केलेल्या इमारत क्र. ११६ कामाठीपुरा, ५ वी गल्ली, भुसरथ सदन बाबत प्रदिर्घ चर्चा झाली.

मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला यांनी असे सुचविले की, ज्या इमारतींचा दुरुस्ती उपकर मार्च १९९२ पर्यंत भरलेला नाही अशा इमारतींच्या दुरुस्तीची अंदाजपत्रके मंडळापुढे प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करु नयेत व ह्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात यावा. ह्या बाबत प्रदिर्घ चर्चा झाली. उपसचिव महाराष्ट्र शासन श्री. यादवराव कांबळे यांनी ह्याबाबत असे प्रतिपादन केले की, अशाप्रकारचा ठराव संमत केल्यास, ज्या इमारतींना दुरुस्तीची अत्यंत आवश्यकता आहे त्या इमारतींचा उपकर मार्च १९९२ पर्यंत भरला गेला नसल्यास सदर इमारत दुरुस्तीपासून वंचित राहील व त्यामुळे अशा इमारतीला अपघात होऊन जिवीत हानी झाल्यास त्याचा ठपका मंडळावर येईल. ह्याबाबत इमारतीच्या स्थितीचाही विचार व्हावा. तसेच उपकर हा इमारत मालक, भाडेकरु/रहिवाशांकडून वसूल करुन घेऊन, महानगरपालिकेकडे जमा करीत नसेल तर अशा प्रकरणी इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांवर अन्याय होईल. ह्या बाबत भाडेकरुंनी इमारत मालकाकडे उपकर जमा केला असेल परंतु इमारत

मालकाने तो महानगरपालिकेकडे जमा नसेल तर अशा प्रकरणी वर नमूद केलेला ठराव लागू करु नये.

ठराव क्रमांक : १४

अ] ज्या इमारतींचा दुरुस्ती उपकर मार्च-१९९२ पर्यंत भरलेला नाही अशा इमारतींच्या दुरुस्तींची अंदाजपत्रके प्रशासकिय मान्यतेसाठी मंडळापुढे सादर करु नयेत असे सर्वानुमते ठरले. तसेच जर भाडेकरु/रहिवाशांनी उपकर मालकाकडे भरुनही मालकाने तो महानगरपालिकेकडे जमा केला नसेल, तर अशा प्रकरणी इमारतीची सद्य:स्थिती लक्षात घेऊन अंदाजपत्रके मंडळाच्या बैठकीपुढे मंजुरीसाठी सादर करावीत असेही सर्वानुमते ठरले. व हया निर्णयाप्रमाणे उपकर परिमंडळातील अकोलावाला बिल्डींग ४८, डॉ. बी. ए. रोड, ई-वार्ड हया इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास दुरुस्ती उपकर पूर्ण भरण्याच्या अटीवर जी मंडळाने प्रशासकिय मान्यता दिली होती त्यातील दुरुस्ती उपकराची अट शिथिल करण्यात आली.

ब] विषयांकित इमारत क्र. ११६, कामाठीपुरा, ५ वी गल्ली, भुसरथ सदन, ई-२ विभागाच्या पहिल्या टप्प्याच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास रु. ७०, ९३९/- इमारतीचा दुरुस्ती उपकर मार्च १९९२ पर्यंत भरुन होण्याच्या अटीवर सर्वानुमते प्रशासकिय मंजूरी दिली.

बाब क्रमांक १४:१० मध्ये पृष्ठ क्रमांक ३७-अ वर सादर करण्यात आलेल्या इमारत क्र. २१ बी हाजी कासम चाळ, कॉपर स्मिथ रोड च्या अंदाजपत्रकाला प्रशासकिय मान्यता देण्याबाबत चर्चा झाली.

मा. उपसभापती श्री. हेमराज शहा यांनी असे प्रतिपादन केले की, ही इमारत फक्त तळमजल्याची असल्याने हया इमारतीला कोणताही धोका नाही त्यामुळे हया इमारतीस तात्काळ दुरुस्तीची आवश्यकता का आहे ? त्याबाबत उपमुख्य अभियंता [उत्तर] हयांनी असे सुचविले की, हयाबाबतचा निर्णय मंडळाने घ्यावा.

सविस्तर चर्चेअंती हया इमारतीची पाहणी मा. सभापती व उपसभापती यांनी करुन निर्णय घ्यावा.

बाब क्रमांक १४/१० मध्ये पृष्ठ क्रमांक ३९ वर सादर केलेल्या इमारत क्र. २४९-२५३ आर. बी. मार्ग हया इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजूरी देण्याबाबत चर्चा झाली.

तद्नंतर सभा संपल्याचे अध्यक्षांनी घोषित केले. तसेच मंडळाची पुढील बैठक २१.१.९४ रोजी व निविदा समितीची बैठक ५.१.९४ रोजी आयोजित केल्याचे घोषित केले.

पृष्ठ क्र. ७ वर सुधारणा
[illegible] एकडे मुख्य अधिकारी

सही/-
सचिव/दु. व पु. मंडळ.

सही/-
मुख्य अधिकारी/दु. व पु. मंडळ.

सही/-
सभापती/दु. व पु. मंडळ.